29 MAR 2017 पुढारी
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या प्रभारी प्र. कुलगुरुपदी डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र. कुलगुरुपदासाठी डॉ. डी. टी. शिर्के यांची निवड आज करण्यात आली. नव्या विद्यापीठ कायद्यानुसार कामात सुसूत्रता आणि समन्वयासाठी ही निवड करण्यात आल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. डॉ. शिर्के हे यांच्याकडे हा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे.

29 MAR 2017 पुढारी

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कमकुवत महाविद्यालय योजनेखाली विद्यापीठाकडून अर्थसाह्य वितरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात अनेक नावीन्यपूर्ण योजना राबविल्या गेल्या. त्यापैकी एक महत्त्वाची योजना म्हणजे कमकुवत महाविद्यालयांना अर्थसाह्य देण्याची योजना.

या योजनेमध्ये विद्यापीठाशी संलग्न कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांचा विचार केला जातो. कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना शासन अथवा विद्यापीठ अनुदान आयोगाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नाही. तसेच संबंधित महाविद्यालये पारंपरिक विद्याशाखांची (कला, वाणिज्य व विज्ञान) असतील तर त्यांना शुल्काच्या माध्यमातून अत्यल्प अर्थसाह्य प्राप्त होते. पर्यायाने ही महाविद्यालये इतर महाविद्यालयांच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या कमकुवत राहतात.



विद्यापीठाच्या कामकाजात होत असलेला संगणकीकरणाचा वापर, भविष्यात त्यात होणारी प्रगती व विस्तार या बाबींचा विचार करून सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थाही संगणकाद्वारे विद्यापीठाशी जोडल्या जाणार आहेत. बऱ्याच कायम विनाअनुदानित पारंपरिक महाविद्यालयांमध्ये संगणक, इंटरनेट, फॅक्स, झेरॉक्स मशिन अशा मूलभूत सुविधांचा अभाव आहे. यावर पर्याय म्हणून विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पारंपरिक विद्याशाखांच्या कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना इतर महाविद्यालयांप्रमाणे सशक्त बनविण्यासाठी विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून कमकुवत महाविद्यालयांना अर्थसाह्य देण्याची योजना सुरू केली आहे. २०१६-१७ मधील शैक्षणिक वर्षात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची शिफारस व व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार रु. ११,२५,०० रुपये इतके भरघोस अर्थसाह्य देण्यात आले. यासाठी सात महाविद्यालये पात्र ठरली आहेत. या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते मंजूर केलेल्या अर्थसाह्याच्या धनादेशाचे वितरण करण्यात आले आहे.

2 9 MAR 2017 लोकमत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**एक लाखाचा धनादेश प्रदान : महावीर अध्यासनासाठी वापरणार**

# लक्ष्मीसेन स्वामीकडून विद्यापीठाला निधी



महावीर अध्यासनासाठी जैन मठाचे प्रमुख डॉ. स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी यांनी एक लाखाच्या निधीचा धनादेश कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडून सुपूर्द केला. यावेळी अजित चौगुले, व्ही. एन. शिंदे, पद्मजा पाटील, डी. बी. खणे, श्रीधर हेरवाडे, राजेंद्र लोखंडे उपस्थित होते.

कोल्हापूर : येथील शुक्रवार पेठमधील श्री लक्ष्मीसेन जैन मठाचे प्रमुख स्वस्तिश्री डॉ. लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनासाठी एक लाख रुपयांचा विश्वस्त निधी गुरुवारी प्रदान केला. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी या निधीच्या धनादेशाचा स्वीकार केला.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, शिक्षणाप्रती अत्यंत सजग असणाऱ्या महास्वामी यांनी स्वत: पी.एचडी करण्याइतकी तळमळ दर्शविली आहे. ही बाब सर्वच विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आदर्शवत आहे. त्यांच्याकडून विद्यापीठास निधी प्रदान करण्यात आला, हा विद्यापीठाचा सन्मान आहे, अशी भावना आहे. या निधीचा विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी सदुपयोग करण्यात येईल, अशी ग्वाही दिली. विद्यापीठ कार्यालयातील या कार्यक्रमास प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, भगवान महावीर अध्यासनाच्या संचालक डॉ. पद्मजा पाटील यांच्यासह प्रा. डी. बी. खणे, प्राचार्य श्रीधर हेरवाडे, प्राचार्य राजेंद्र लोखंडे उपस्थित होते.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 MAR 2017
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात शहिदांना अभिवादन

कोल्हापूर : शहीद दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांच्या प्रतिमांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विशेष कार्य अधिकारी डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा संचालक महेश काकडे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, समाजशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. जगन कराडे, डॉ. भारती पाटील, डॉ. भगवान माने, डॉ. ए. एम. गुरव यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

# असे का घडावे?

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाच्या चार तरूण विद्यार्थ्यांचे गेल्या सहा-सात वर्षात आकस्मिक निधन झाले. सुन्न करणा-या घटना



निशब्द: करत, विचारांची तरंग मनात उमटवत राहतात. असे का घडावे ? याचा उत्तर शोधण्याचा प्रयत्न मासकॉम कुटुंब करते. आठवणी काढत, हळहळत , असे व्हायला नको होते ? या प्रकारच्या प्रतिक्रिया उमटत जातात. विद्यार्थ्यांच्या अकाली निधनाने विभागातील प्रत्येक घटक हळहळतो. तसेच अनेक प्रश्न निर्माणही करतो. मीडियाच्या क्षेत्रातील स्वप्न खुलवत असताना, प्रत्यक्ष काम करत असताना पंचवीस- तिशीच्या आतील विद्यार्थी ब्लड कॅन्सरने जातात, ॲनिमिक होतात किंवा पांढ-या पेशींच्या संख्या कमी झाली, आत्यंतिक तणाव या कारणाने अकाली एक्झीट करतात, हे समजल्यावर विभागातील युवावर्गामध्ये अस्वस्थता निर्माण होणे स्वाभाविक आहे. अमित ओहोळ, अमर पाटील, प्रवीण भोसले आणि नुकतेच जग सोडून गेलेला श्रीपाद कदम यांच्यातील समान धागा म्हणजे त्यांना आई-वडील नाहीत किंवा यापैकी एकजण नाही. इतरांनी केलेला सांभाळ, आर्थिक परिस्थिती बेताची, पण काहीतरी करण्याची जिद्द, डोळ्यात स्वप्ने आणि स्वाभिमानी वृत्ती होती. या विद्यार्थ्यांना समजून घेण्याची संधी मासकम्युनिकेशन विभागाची समन्वयक म्हणून मला मिळाली.

विद्यापीठात प्रवेश घेताना, चाचपडत, साशंक विद्यार्थी हा हळूहळू वसतिगृहे, अधिविभाग, ग्रंथालये, विद्यापीठ कॅम्पसमध्ये रूळतो. घरापासून लांब, आर्थिक परिस्थिती सांभाळत माध्यमांच्या दुनियेत प्रवेश करण्याची तयारी करत ही तरूण मुले स्वत:ला सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. विभागात होणारी विविध व्याख्याने, या क्षेत्रातील नामवंत, अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन, कार्यशाळा, चर्चासत्रे, अभ्यास सहल, माध्यम प्रशिक्षण, नियतकालिके यांमध्ये सहभागी होतात. दिलेल्या वेळेत प्रात्यक्षिके पूर्ण करण्याची तयारी करतात. कारण माध्यमांमध्ये असलेली 'डेडलाइन', छपाईची किंवा कार्यक्रम प्रसारित करण्याची ही महत्वाची असल्याने, विभागात तशी तयारी करून घेतली जाते. स्वागत आणि निरोप समारंभ सांस्कृतिक कार्यक्रम आणि वाढदिवस यातून विद्यार्थी एकमेकांमध्ये मिसळतात, एकमेकांना जाणून घेतात. शहरात आणि शहराबाहेर छोट्या-मोठ्या सहली करतात, लघुपट तयार करतात. छायाचित्रे काढत राहणे आणि ते विविध माध्यमांतून शेअर करणे हे कमालीचे आवडते उद्योग हे विद्यार्थी करतात. एकमेकांच्या मदतीला रात्री-अपरात्री धावून जाणे, मदत करणे हा सुद्धा स्थायीभाव असल्याने, 'तुझे प्रश्न हे माझे प्रश्न' या भूमिकेत मदत करत राहतात. विद्यार्थ्यामध्ये एक अनोखे नाते तयार होत आपुलकी, स्नेह, मदत यांचा सुरेख मेळ तयार होतो. हे नाते पुढे प्रत्यक्ष व्यवसायात गेल्यानंतरही तसेच टिकवण्याचा प्रयत्न होतो.

अमित ओहोळ, अमर पाटील, प्रवीण भोसले, श्रीपाद कदम यांच्यापैकी अमित ओहोळ हा पंढरपुरच्याजवळ असलेल्या छोट्या गावातून आलेला, त्यांच्या वर्गात प्रथम आलेला आणि पत्रकार म्हणून कार्यरत असणारा. अतिरिक्त ताण-तणावाला तो बळी पडला. श्रीपाद कदमचे अंध आई-वडील त्याच्या बालपणीच गेले. दोन वृत्तपत्रातील कामाचा अनुभव असणारा, अत्यंत अबोल, संयमी, हसरा श्रीपाद 'ब्लॅड कॅन्सर'ने गेला. अमर हा हॉर्ट अटॅकने विद्यापीठाजवळ राहत असलेल्या खोलीत कोसळला तर अत्यंत चांगले व्यक्तिमत्व असलेला, हसरा प्रवीण हा ब्लॅड कॅन्सरने गेला. या चौघांच्या अकाली निधनाने, हृदय हेलावणा-या आठवणी, फोटो, विद्यार्थ्यांनी एकमेकांना केवळ साठवल्याच नाही तर श्रीपादचा वैद्यकिय खर्च मिळावा यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी प्रयत्न केला. मंत्रालयात विविध पदावर कार्य करणा-या विद्यार्थ्यांनी श्रीपादच्या वर्गातील उत्तम पोवार आणि अभिजित देवकुळे यांना सहकार्य केले. मागच्याच वर्षी अर्थशास्त्र विभागाचा विद्यार्थी हा पाण्याची बॉटल आणण्यासाठी, रस्ता ओलांडताना अपघातात गेला. हा विद्यार्थी अर्धवेळ नोकरी करत असताना अपघात झाला. या घटनेने अनेकजण अस्वस्थ झाले. आर्थिक परिस्थिती नाही म्हणून हॉटेल्स, एटीएम, बांधकाम अशा स्वरूपाचे कामे करत बहुसंख्य विद्यार्थी शिकत असतात. विद्यापीठाची 'कमवा आणि शिका' ही योजना, अर्थसहाय्य, अपघाती विमा योजना, 'मागेल त्याला काम' या पुरेशा ठरतातच असे नाही. विद्यार्थी कल्याण विभागाचे माजी संचालक प्रा. डॉ. डी. के. गायकवाड आणि माजी परिक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी अनेक विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिला. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना आधार मिळाला. विद्यार्थी भवनमध्ये निवास व्यवस्था आणि भोजन हे मोफत मिळत असल्याने, अनेक विद्यार्थी पुढे आपले करियर घडू शकले. सुरक्षित वातावरणातून बाहेर पडल्यावर येणा-या मानसिक-आणि आर्थिक परिस्थितीला सामोरे जाताना विद्यार्थी कोलमडून पडतात. अशा विद्यार्थ्यांना, आजी-माजी विद्यार्थी संघटनांनी मानसिक आणि आर्थिक बळ देण्याची आवश्यकता आहे. विद्यापीठात शिकत असताना मित्र-मैत्रिणी, सहकारी, प्राध्यापक यांच्याशी मोकळेपणाने बोलणे आणि आपल्या समस्यांमधून मार्ग काढणे हेही तेवढेच महत्वाचे आहे. श्रीपाद कदम याच्या अकाली निधनाने उमटलेल्या प्रतिक्रियांचे रूपांतर एका सक्षम मदत निधीमध्ये होण्याची नितांत आवश्यकता वाटते. घरी परिस्थिती नाही म्हणून विद्यार्थी एकापाठोपाठ एक, दोन-तीन पदव्युत्तर पदव्या घेतात आणि स्वत:चे अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न करतात, हे चांगले असले तरी स्पर्धेला स्वत:ला तयार करून जीवनात स्थिर होण्यासाठीचे कौशल्य देण्याची जशी आवश्यकता आहे, तशीच स्वत: त्यासाठी प्रयत्न करणेही गरजेचे आहे.

**● डॉ. निशा मुडे-पवार**
nishapawar1968@rediffmail.com

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 MAR 2017
तरुण भारत

# कमकुवत महाविद्यालयांना विद्यापीठाकडून अर्थसहाय्य

**कोल्हापूर :** विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात अनेक नाविन्यपूर्ण योजना राबविल्या गेल्या. त्यापैकी एक महत्वाची योजना म्हणजे कमकुवत महाविद्यालयांना अर्थसहाय्य देण्याची योजना.

शैक्षणिक वर्ष २०१६–१७ मध्ये कुलगुरू यांनी केलेली शिफारस व व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार ११ लाख २५ हजार इतके अर्थसहाय्य देण्यात आले. या करिता सात महाविद्यालये पात्र ठरली आहेत. या महाविद्यालयाना मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याच्या धनादेशाचे वितरण करण्याकरिता संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य व कुलगुरू यांची संयुक्त बैठक झाली होती. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सहाय्यक कुलसचिव डॉ. व्ही. जे. ढेरे, प्राचार्य डॉ. वाय.बी. गोंडे (शंकरराव जगताप आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज वाघोली, ता. कोरगाव, जि. सातारा,) प्र. प्राचार्य डॉ. प्रतिभा पाटणे, (राजेंद्र महाविद्यालय, खंडाळा) प्राचार्य डॉ. बी. एस. लोखंडे, भिमराव शिंदे (कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, वाई) प्र. प्राचार्य डॉ. एन. आर. गवळी (म्हैशाळ महाविद्यालय, म्हैशाळ) प्र. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील (आटपाडी कॉलेज, आटपाडी), प्र. प्राचार्या एस. एस. भोसले (महिला महाविद्यालय, बीड) आदी उपस्थित होते. उपस्थित प्राचार्यांना मंजुर केलेल्या अर्थसहाय्याच्या धनादेशाचे वितरण करण्यात आले.

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्राचार्यांना दिले धनादेश**

29 MAR 2017

सकाळ

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सात कमकुवत महाविद्यालयांना सव्वाअकरा लाखांचा निधी

## कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना साह्य; कुलगुरू व प्राचार्य यांच्या बैठकीत वितरण

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठातर्फे सात कमकुवत महाविद्यालयांना ११ लाख २५ हजार रुपयांचा निधी नुकताच देण्यात आला. कुलगुरू व प्राचार्य यांच्या बैठकीत त्याचे वितरण झाले. विद्यापीठाशी संलग्नित कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांना हा निधी दिला जातो.



यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सहायक कुलसचिव डॉ. व्ही. जे. ढेरे, प्राचार्य डॉ. वाय. बी. गोंडे, प्रभारी प्राचार्य डॉ. प्रतिभा पाटणे, प्राचार्य बी. एस. लोखंडे, प्रभारी प्राचार्य डॉ. एन. आर. गवळी, प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, प्रभारी प्राचार्या एस. एस. भोसले उपस्थित होते.

### कमकुवत महाविद्यालये व निधी :

- भीमराव शिंदे कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय (वाई) - कला व वाणिज्य प्रत्येकी ७५ हजार, विज्ञान - १ लाख
- कला व वाणिज्य महाविद्यालय (उंडाळे, कऱ्हाड) - कला व वाणिज्य - प्रत्येकी ७५ हजार
- शंकरराव जगताप आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज (वाघोली, ता. कोरेगाव, जि. सातारा) - वाणिज्य - ७५ हजार
- आर्टस् अँड सायन्स कॉलेज (आटपाडी, जि. सांगली) - कला - ७५ हजार
- राजेंद्र महाविद्यालय (खंडाळा, जि. सातारा) - कला व वाणिज्य प्रत्येकी ७५ हजार, विज्ञान - १ लाख
- म्हैसाळ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (म्हैसाळ, जि. सातारा) - कला व वाणिज्य प्रत्येकी ७५ हजार
- महिला कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (कसबा बीड, ता. करवीर) - कला - ७५ हजार, विज्ञान - १ लाख

### वर्ष व दिलेला निधी असा :

- २०१२-१३ ........ १ लाख ४५ हजार
- २०१३-१४ ........ ३ लाख
- २०१४-१५ ........ १ लाख ९५ हजार
- २०१५-१६ ........ ५ लाख २५ हजार

### शुल्कातून अर्थसाह्य

कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना शासन अथवा विद्यापीठ अनुदान आयोगाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नाही. महाविद्यालये पारंपरिक विद्याशाखांची (कला, वाणिज्य व विज्ञान) असतील तर त्यांना शुल्काच्या माध्यमातून अल्प अर्थसाह्य मिळते.

2 9 MAR 2017 पुढारी
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांचा अमृतमहोत्सवी सत्कार २ एप्रिलला



**कोल्हापूर :** प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांच्या वयाला १ एप्रिल रोजी ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने त्यांचा सपत्नीक अमृतमहोत्सवी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. रविवार, दि. २ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता, मिरज (जि.सांगली) येथील पटवर्धन हॉल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, हा सत्कार समारंभ होणार आहे. माजी खासदार कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या हस्ते सत्कार होईल. यानंतर डॉ. जे. एफ. पाटील यांनी लिहिलेल्या 'व्यक्ती, विचार व अर्थ', 'नोटाबंदी काही निबंध', 'प्रश्न पाण्याचा' आणि 'कॉन्फ्रॉन्टिंग प्रॉव्हरटी' या पुरस्तकांचे प्रकाशन आ. डॉ. पतंगराव कदम, आ. जयंतराव पाटील, माजी आ. प्रकाश आवाडे आणि मुंबई येथील ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. दिलीप नाचणे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. बी. पी. साबळे, माजी आ. मानसिंगराव नाईक, दी न्यू मिरज एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष अरविंदराव मराठे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. जे. एफ. पाटील अमृतमहोत्सव सत्कार समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. अर्जुनराव महाडिक, प्रा. डॉ. पी. बी. कुलकर्णी, प्राचार्य राजू झाडबुके, कार्यवाह प्रा. सुभाष दगडे यांनी केले आहे.